# पोलीस आयुक्तालय, अमरावती शहर

दिनांक ११/०१/२०२३ -दैनिक गुन्हे

भाग १ ते ५

| अ. क्र. | पो.ठाणे | गु.र. नं. व कलम | गुन्हा घडला ता.वेळ | गुन्हा दा. ता.वेळ | फिर्यादी नांव पत्ता व वय | अटक/पाहिजे आरोपीचे नांव | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| १ | पो स्टे गाडगे नगर अमरावती | अप क्र ५८/२३ कलम ३२४,३४ भादवि | दि १०-०१-२०२३ चे २०.०० वा | दि ११-०१-२०२३ चे ०२.३६ वा | अश्विन अशोक पहाडन वय २१ वर्षे धेदा मजुरी रा विलास नगर अमरावती | राहुल व त्याचे सोबत +३ मित्र | हकीकत अश्याप्रकारे आहे की,नमुद घ ता वेळी व ठिकाणी फिर्यादीचे मित्राचे बहिनीचा वाढदिवस असल्याने तेथे गेले असता वाढदिवसाचा कार्यक्रमात डिजे मध्ये महिला नाचत असतांना आरोपी राहुल मध्ये गेला असता त्याला टोकले की तु महिलामध्ये नाचु नको तर तो तिथुन निघुन गेला .फिर्यादी व मित्र कार्यक्रम संपल्यावर घरी जात असतांना नमुद सर्व आरोपी ग्रे कलर अँक्टीव्हा गाडीवर बसले होते त्यांनी आम्हीला बघुन दगड मारणे सुरु केले दगड मारले त्यामध्ये फि चे डोक्याला मार लागला व निखील उगले याला सुदधा डोक्याला कानाला दगड लागला व अनिल याला सुद्धा तोंडाला दगड लागला तसेच निखील याचे डोक्याला जास्त मार लागल्यामुळे तो तेथेच खाली पडला.अशा फिर्यादीचे जबानी रिपोर्ट व मेडीकल सर्टी वरुन सदरचा गुन्हा दाखल. |
| ३ | पो स्टे गाडगे नगर अमरावती | अप क्र ६०/२३ कलम २७९,३३७, भादवि सहकलम १८४,१३४,१७७ मोवाका | दि ११-१-२०२३ चे ०६.१५ वा दरम्यान | दि ११-०१-२०२३ चे १३.०६ वा | गौरव बाबाराव भोरे वय ३५ वर्ष रा काकडा ता अचलपुर जि अमरावती ह मु अर्जुन नगर अम | अज्ञात मोटर सायकल चालक | यातील हकीकत अश्याप्रकारे आहे कि नमुद घ ता वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी हे मा.आमदार श्री बच्चुभआऊ उर्फ ओमप्रकाश कडु यांचे सह श्री रवि वैदय यांची वाट पाहत होते ते आल्यावर मा.आमदार सा हे त्यांना भेटण्याकरिता रोड क्रॉस करु दुसऱ्या बाजुला जात असतांना यातील अज्ञात आरोपी हा त्याचे माटर सायकल सह रहाटगाव रोड कडुन भरधाव वेगाने निष्काळजी पणाने वाहन आणुन मा श्री बच्चु कडु यांना धडक दिली व निघुन गेला. सदर अपघातमुळे मा आमदार श्री बच्चुभाऊ कडु यांना कपाळाला व पायाला मार लागला अश्या फि चे जबाणी रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल. |
| ५ | राजापेठ | ४३/२०२३ कलम ३०७, ३४,४४८,५०४भ ा.द.वि. | दि.१०/०१/२०२ ३ चे २३.०० वा ते २३/३० वा. दरम्याण | दि.११/०१/२०२३ चे ०२.५८ वा | नितीन श्रींपतराव साखरे वय ४२ वर्षे रा.उत्तमनगर डॉं बाबासाहेब महाविद्यालय जवळ अमरावती. | अज्ञात | हकीकत थोडक्यात अशा प्रकारे आहे की यातील फिर्यादी व जख्मी हे जोगळेकर प्लॉट येथे अंतविदीसाठी संतोष भामोदकर यांचे घरी गेले असता यातील आरोपीतांनी जोरजोरात शिवीगाळ करित आले फिर्यादिंनी त्यांना येथे शिवीगाळ करू नका डेथ झाली आहे असे म्हणाले असता आरोपीतांनी फिर्यादी व जख्मीस डोक्यावर काचेची बॉटल तसेच जख्मी क्र.२ रामदास विठोबाजी मसराम यास डोक्यावर मानेवर पाठीवर मांडीवर ढुंगणावर चाकुने मारून मारून गंभिर जख्मी केले जख्मीचे बयानावरून तसेच डॉक्टर सा.यांनी दिलेल्या मेडिकल सर्टीवरून वरुन सदरचा गुन्हा दाखल. |
| ६ | राजापेठ | ४५/२०२३ कलम ३७९ भादवि | दि.10/०१/२०२ ३ चे १०/०० वा ते ११/०१/२०२३ चे ०८/०० वा दरम्यान | दि.११/०१/२०२३ चे १४.११. वा | धीरज रामदास चवाळे वय ३८ वर्षे रा.क्रांतीकाँलनी यादव लेआऊट अमरावती | अज्ञात | हकीकत अश्या प्रकारे आहे की यातील नमुद घ.ता.वेळी व ठिकाणी फिर्यादी यांनी त्यांचे घरासमोर त्याचा रिक्षा क्रमांक एम एच -२७, बी.डब्ल्यु-५५३५ लावला होता सकाळी उठुन त्यांनी रिक्षा बघीतला असता त्यांचे रिक्षाची शिट उघडी दिसली त्यामधील कंम्पनीच्या ४ बँटरी कि.अंदाजे २०,०००/- रू.ची कुणी तरी अज्ञात चोराने चोरून नेली अश्या फिर्यादीचे जबानी रिपोर्टे वरून सदरचा गुन्हा दाखल. |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ७ | पो.स्टे- सिटी कोतवाली | अप क्र १३/२०२३ कलम ३७९ भादवी | दि ३०/१२/२०२२ रोजी ०२.०० ते ०३.०० वा दरम्यान | दि ११/०१/२०२३ चे १३.४० वा | प्रविण यादवराव चव्हाण वय ४८ वर्षे व्यवसाय शेती रा देवरी निपाणी पोस्टे वलगाव जि अमरावती | अज्ञात | हकिकत अशा प्रकारे आहे की, नमुद घ ता वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी हे मुलीचे नर्सचे ॲडमिशन घेणे करीता आले असता गाडी उभी करुन दवाखाण्याच्या आत गेले व काम झाल्यानंतर परत गाडी घेणेकरीता आले असता सदरची गाडी मिळुन आली नाही सदर गाडीचा आजपावेतो शोध घेतले व गाडीचे कागदपदत्र आज रोजी मला मिळाल्याने मी आज रोजी पोस्टे कोतवाली येथे तक्रार देण्याकरीता आलो अशा फिर्यादीच्या जबानी रिपोट वरुन सदरचा गुन्हा दाखल. |

## प्रोव्हीबीशन

| अ.क्र. | पो.ठाणे | गु.र. नं. व कलम | गुन्हा घडला ता.वेळ | गुन्हा दा. ता.वेळ | फिर्यादी नांव पत्ता व वय | अटक/पाहिजे आरोपीचे नांव | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| १ | राजापेठ | अप क्र.४४/२०२३ कलम ६५ (ई) म.दा.का | 11/01/2023 चे ११/०० वा ते ११/३० वा.दरम्यान | दि.११/०१/२०२३ चे १३.३५ वा. | पोहेकाँ मनिष करपे ब.नं.१२५० पो.स्टे.राजापेठ अमरावती | सचिन पुंडलिकराव दुर्गे वय २६ वर्षे रा. बेलपुरा अमरावती | हकीकत अश्या प्रकारे आहे की यादील नमुद घ.ता.वेळी व ठिकाणी यातील नमुद आरोपी हा त्याचे राहते घरी अवैध्य रित्या दारूचा साठा बाळगंताना मिळुन आला त्याचे घराची झडती घेतली असात दाराच्या मागील बाजुस ठेवलेल्या दोन नाँयलाँन पिशवीची पाहाणी केली असता जप्ती पंचनाम्याप्रमाणे एकुन १)२३० नग देशी दारू बाँबी संत्रा कंपनीच्या ९० मी.ली.च्या सिलबंद पावट्या कि.अं.८,०५०/- रू. २) ९२ नगर देशीदारू टँगो पंच कंपनिच्या ९० मी.ली च्या पावट्य कि.अं.३२२०/- असा एकुन ११,२७०/- रू चा माल मिळुन आल्याने त्याचे क़त्य कलम ६५ (ई) म.दा.का.प्रमाणे होत असल्याने त्याच्यावर सदरचा गुन्हा दाखल. |
| २ | पोस्टे सिटी कोतवाली | अप क्र १४/२०२३ कलम ६५ ई मदाका | दि ११/०१/२०२३ चे दुपारी १२.१० वा ते १२.५५ वा दरम्यान | दि ११/०१/२०२३ चे १३.५९ वा | सर तर्फे दिपक महादेवराव सुदंरका ब नं १४५६ गुन्हे शाखा अमरावती | पवन उर्फे आबा रामचंद्र कोरोची वय ३४ वर्षे रा समाधान नगर अमरावती | हकिकत अशा प्रकारे आहे की, नमुद घ ता वेळी व ठिकाणी मिळालेल्या गुप्त माहीती वरुन नमुद आरोपी वर प्रोव्ही रेड केली असता आरोपीचे ताब्यातुन जप्ती पंचनाम्या प्रमाणे ५२ नग देशी दारु बॉबी संत्रा प्रत्येकी ९० एमएल च्या सिलबंद पावटया कि २०८०/- रु, ४३ नग देशी दारु टँगोपंच प्रत्येकी ९० एमएल च्या सिलबंद पावटया कि १७२० रु चा असा एकुण ३८००/- रु प्रोव्ही माल मिळुन आल्याने अशा फिर्यादीच्या लेखी रिपोट वरुन सदरचा गुन्हा दाखल. |